# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१४/०८/२०१६.

**१) बारमधील नगदी पैश्याची व दारुने भरलेली बॉटलांची चोरी .:–**

दिनांक १२/०८/२०१६ रोजी २२.३० वा. दर. यातील फिर्यादी आपल्या बार व गोडांऊन बंद करून घरी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण बार गोडाऊनच्या वरच्या जिन्यावर चढुन आत प्रवेश करून कांऊटर मधील नगदी ३६,०००/–रू. व ३ नग सिग्नीचर कंपनीचे दारूने भरलेले, ४ नग बॉटल एकुण कि. ३७,२२०/–रू. चा माल मानेगाव सडक येथुन चोरून नेल्याने फिर्यादी राहुल गोवर्धन मेश्राम वय २५ वर्ष रा. धानला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४६१,३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) अवैधरित्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक १३/०८/२०१६ रोजी ०८.१५ वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल १०१६ च्या चालकाने ट्रॉली क्र. एमएच ३६ बी १२४४ च्या चालकाने अवैद्यरित्या रेती उत्खनन करून बिना रॉयल्टी १ ब्रास रेती कि. २,०००/–रू. ची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने तसेच घटणास्थळ पंचनामा तयार करतांना आरोपी हा पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. राऊत यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,२२५(ब),भादंवि सहकलम २०७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) अवैध देशी दारू अडयांवर धाडी. :–**

दिनांक १३/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. वरठी, सिहोरा व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू+सडवा+साहीत्य कि. १८,६००/–रु. चा तसेच ७२० मिली देशी दारु कि. २०० /–रु. माल एकुण कि. १९,०००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६११९९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.